## महिन्याचा विचार

''महामृत्यूंजय मंत्र'' मात्र गुरूदेवांना प्राणाहून प्रिय होता. सर्व वयोगटांसाठी हे दैवी वरदान आहे आणि प्रत्येक साधकाच्या हृदयात तो अंतर्भूत करण्यात गुरूदेवांनी कधीही कसर केली नाही. संकीर्तनांचे त्यांना इतके वेड होते की, त्यांच्या प्रेरणेने ३ डिसेंबर १९४३ पासून सुरु झालेलं हे मंत्रोच्चारण आजतागायत आश्रमाच्या भजन हॉलमध्ये अहर्निश सुरू आहे. या प्रभावी मंत्रोच्चाराचा परिणाम अध्यात्मिक प्रवाह सुरू ठेवण्यात आणि साधकांना स्वत:च्या साधनेच्या वाटचालीस मदत करण्यात होताना दिसतो.

सर्व सभा आणि परिषदांच्या संयोजकांना स्वामीजी प्रोत्साहन देत आणि असे अखंड कीर्तन सुरू ठेवण्यास सांगत. संकीर्तन समाविष्ट केले की आपोआप उपक्रम यशस्वी होतो. गुरूदेवांच्या कीर्तनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांतील अद्वैतवाद! दैवतांमधील एकरूपता त्यांच्या कीर्तनामध्ये आढळते. विविध विचारसरणीच्या आणि अध्यात्मिक पाऊलवाटांच्या अनुयायांनाही म्हणूनच त्यांना योग्य सन्मान द्यावासा वाटला



आणि असंख्य मार्गांनी त्यांचे पूजन करावेसे वाटले. महामंत्र आश्रम सत्संगाच्या दैनंदिनीचा एक भाग असला तरीही स्वामीजी दररोज एका देवाची आळवणी करणारे विशेष गीत सादर करीत. रविवारी–सुर्य, सोमवारी–भगवान शिव, मंगळवारी देवी आणि सुब्रह्मण्य, गुरूवारी गुरू, दिव्य माता– शुक्रवारी, आणि हनुमंत–शनिवारी ! विविध उत्सवांमध्ये, सणांच्या प्रसंगी गुरूदेव कीर्तनामध्ये त्या त्या दैवताचे गुणविशेष सादर करीत – उदा. दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती यांचे संकीर्तन नवरात्रात, शिवरात्रीला सांब–सदाशिवाचे, स्कंद–षष्टीला भगवान स्कंदाचे, रामनवमीला प्रभू श्रीरामाचे आणि जन्माष्टमीला भगवान कृष्णाचे !

येशू ख्रिस्त, अल्लाह, झरतृष्ट यांच्या संदर्भातील महत्वाच्या प्रसंगी आणि ज्या ज्यावेळी त्यांचे अनुयायी सत्संगात सहभागी असत अशा सर्व कार्यक्रमांमध्ये स्वामीजी त्यांच्याविषयी संकीर्तन करीत आणि सर्व धर्मांप्रति त्यांच्या मनात असलेल्या आदरभावाचे दर्शन होई.

या आणि अशा सर्व प्रसंगी गुरूदेव साधकांना देवाप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहीत करीत. निव्वळ देखाव्याचे त्यांना वावडे होते. आसपास गोंगाट अथवा



वाद्यमेळासाठी त्यांचा आग्रह नसे. समाधी उन्मादी कीर्तनासाठीही त्यांच्या मनात स्थान नव्हते. हळुवार, मधुर स्वरात भजन म्हणावे ज्यायोगे हृदयस्थ प्रभूला ते ऐकावेसे वाटेल असा त्यांचा आग्रह असे. एकदा ते म्हणाले – ''असे गायन तुम्हाला भाव–समाधीप्रत नेईल.''

(क्रमश:)

**- Sivananda's Integral Yoga**

स्वामी वेंकटेशानंद

२२ जानेवारी रोजी झालेल्या अयोध्या येथे झालेल्या रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापना सोहोळ्याच्या पार्श्वभूमीवर पूवी एकदा प्रभू श्रीरामाबद्दल स्वामीजींनी व्यक्त केलेले विचार –

We share some abstract of his talk. Today is the auspicious day when consecration of Rama Lalla and other big idol (Murti) have been consecrated in रामजन्मभूमि मंदिर at अयोध्या.

The Country as a whole and Hindus and other faith devotees have worshipped Lord Rama, one of the most sublime incarnations of Lord Vishnu.

Rama is an ideal that has decisively influenced the fabric of Hindu society and has ever been an inspiring example for emulation. The noble call to Dharma is the keynote in the theme of Ramayana. The life of righteousness is the true life. It is heroic living and you must have the courage of your ethical conviction. Let faith fill you with strength to live with highest adherence to the duty. Let name of the Lord give you power of self-sacrifice in the cause of the highest Dharma. May the glorious example of Rama inspire you with spiritual power to lead a divine life of sacrifice, selflessness and service unto all. Worship Rama and become like him through one pointed devotion to him. Rama means supreme reality. What is Jehova of the Judiac people, Father in heaven of the Christians, the Allah of Islamic people, Ahur Mazda of followers of Zeroastriasm, the supreme Tao of the Taoist, Ek Omkar Satnam of the Sikhs- this the people who follow Vedic religion call RAM.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- जानेवारी २०२४ चा सत्संग १४ तारखेला झाला.
- 'दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा जानेवारी २०२४ चा अंक परिवारातील सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी तसेच व्हॉट्सअप द्वारे पाठविण्यात आला.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



पुणे शाखा
वर्ष १९/अंक ०२
फेब्रुवारी २०२४

Move towards your divine destiny. Do not be petty. Do not hunker after fruits and results. Be impersonal. Be patient. And know for sure, that if you bring the right causes into being, the right effects are bound to follow. When a cause is created, the effect must follow. This is great law. So, if you fulfil your duty, whatever has to come, must follow. No power in this universe can deprive you of what you have worked for. No power on earth can deprive you of what you have deserved. Be assured of this.